# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email :- gug.registrar@gmail.com दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था./ ६८०८ /२०२१ दि. ०२ /११/२०२१

## परिपत्रक

विषय:- आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने दि. ०१ ते ३० नोव्हेंबर, २०२१ या कालावधीत पात्र विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी करण्याबाबत.

संदर्भ:- राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. रानिआ/मनपा-२०२१/प्र.क्र.०१/का-१०, दि. २०/१०/२०२१.

सर्व संबंधितांना याव्दारे कळविण्यात येते की, संदर्भिय पत्रानुसार भारत निवडणूक आयोगातर्फे दि ०१ जानेवारी, २०२२ या अर्हता दिनांकावर आधारीत मतदार यादी संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम दि. ०१ ते ३० नोव्हेंबर, २०२१ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. मतदार यादी संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाच्या निमित्याने दि. ०१ जानेवारी, २०२२ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदान करण्यासाठी दि. ०१ ते ३० नोव्हेंबर, २०२१ या कालावधीत मतदार म्हणून नाव नोंदविण्याची संधी आहे. पात्र विद्यार्थ्यांची प्रथमत: विधानसभा मतदार यादीत नाव नोंदणी करणे आवश्यक असून मतदार यादीत छापील अर्जाद्वारे आणि ऑनलाईन पध्दतीनेदेखील नाव नोंदविता येते.

करीता सर्व संबंधितांनी संदर्भिय पत्राचे अवलोकन करुन त्यानुसार कार्यवाही घ्यावी.

**संलग्न:-** संदर्भिय प्रत.

**(डॉ. अनिल चिताडे)**
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी:-**

१. मा. कुलगुरू महोदयांचे स्वीय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरुंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. जिल्हाधिकारी, कार्यालय, गडचिरोली.
४. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव सविनय सादर.
५. मा. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना तथा नोडल अधिकारी व मार्गदर्शक, निवडणूक साक्षरता मंडळ, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव सविनय सादर.
६. गोंडवाना विद्यापीठ, सर्व पदव्युत्तर शैक्षणिक विभागांचे मा. विभाग प्रमुख यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव सविनय सादर.
७. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.
८. आस्थापना व प्रशासन विभाग(नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**(डॉ. विजय सिलारे)**
उपकुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/मनपा-२०२१/प्र.क्र.०१/का-१०
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: २० ऑक्टोबर, २०२१

प्रति,
मा. कुलगुरु (सर्व),

**विषय:** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या अनुषंगाने दि. १ ते ३० नोव्हेंबर, २०२१ या कालावधीत पात्र विद्यार्थ्यांची मतदार नोंदणी करण्याबाबत.

महोदय,

भारत निवडणूक आयोगातर्फे दि. १ जानेवारी २०२२ या अर्हता दिनांकावर आधारीत मतदार यादी संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम दि. १ ते ३० नोव्हेंबर २०२१ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. त्यासाठी दि. १ नोव्हेंबर २०२१ रोजी विधानसभेची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल. त्यावर दि. ३० नोव्हेंबर २०२१ पर्यंत दावे व हरकती दाखल करता येतील. त्या अनुषंगाने दि. ५ जानेवारी २०२२ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल. तीच अंतिम मतदार यादी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांसाठी वापरण्यात येणार आहे.

मतदार यादी संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाच्या निमित्ताने दि. १ जानेवारी २०२२ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मतदान करण्यासाठी दि. १ ते ३० नोव्हेंबर २०२१ या कालावधीत मतदार म्हणून नाव नोंदविण्याची संधी आहे. कारण भारत निवडणूक आयोगाने तयार केलेली विधानसभा मतदार संघांचीच मतदार यादी राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा/ नगरपंचायती, जिल्हा परिषदा/ पंचायत समित्या व ग्रामपंचायती या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी त्या-त्या स्थानिक स्वराज्य संस्थेतील मतदारसंघनिहाय विभागून जशीच्या तशी वापरली जाते.

वरील पार्श्वभूमी लक्षात घेवून आपल्या विद्यापीठातील आणि त्यांतर्गत महाविद्यालयांतील पात्र विद्यार्थ्यांची प्रथमत: विधानसभा मतदार यादीत नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. मतदार यादीत छापील अर्जाद्वारे आणि ऑनलाईन पद्धतीनेदेखील नाव नोंदविता येते. छापील अर्जाद्वारे नाव नोंदविण्यासाठी संबंधित महानगरपालिका प्रभाग/ जिल्हाधिकारी/ तहसिल कार्यालय अथवा मतदार नोंदणीसाठी स्थापन करण्यात

आलेल्या केंद्रावर जाऊन नमुना-६ मधील अर्ज सादर करावा लागतो. ऑनलाईन मतदार नोंदणीदेखील अत्यंत सुलभरीत्या करता येते. त्यासाठी https://www.nvsp.in/ या संकेतस्थळास भेट देऊन नाव नोंदणी करता येईल. मतदार नोंदणीकरिता वयाची १८ वर्ष पूर्ण झाल्याचा पुरावा, रहिवास/ निवासी पत्त्याचा पुरावा आणि स्वत:चे छायाचित्र आवश्यक असते.

आपणास विनंती आहे की, अधिकाधिक पात्र विद्यार्थ्यांनी मतदार यादीत नाव नोंदणी करण्याकरिता विद्यापीठ स्तरावर एका नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात यावी. त्याचबरोबर विद्यापीठांतर्गत महाविद्यालयांमध्येदेखील या कामाकरिता नोडल अधिकारी नियुक्त करण्याच्या सूचना आपल्या माध्यमातून देण्यात याव्यात. मतदार यादीत नावे नोंदणीसाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्याबरोबरच राष्ट्रीय सेवा योजना, विविध उपक्रम आणि कार्यक्रमांच्या माध्यमातून दि. १ ते ३० नोव्हेंबर, २०२१ या कालावधीत इतर नागरिकांसाठीदेखील जनजागृती मोहीम राबविण्यात यावी. कारण या कालावधीत नवीन मतदार म्हणून नाव नोंदणीबरोबरच पत्त्यांतील बदल, नावातील दुरूस्ती; तसेच दुबार अथवा मृत व्यक्तीचे नावदेखील वगळता येते. यासाठी जनजागृतीची आवश्यकता आहे. त्याकरिता संबंधित जिल्हाधिकारी अथवा महानगरपालिका कार्यालयाशी संपर्क साधण्याचे निर्देश संबंधितांना द्यावेत, अशी विनंती आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या मान्यतेने,

आपला,

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**प्रतिलिपी (माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव):**

१) प्रधान सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र मंत्रालय, मुंबई-३२.
२) विभागीय आयुक्त (सर्व)
३) जिल्हाधिकारी (सर्व)
४) महानगरपालिका आयुक्त (सर्व)
५) सर्व कार्यासने, रा.नि.आ.